## प्रकरण तिसरे

# ‘सहावं बोट’ आणि ‘हातचा १’ या कथासंग्रहाचे आशयसूत्र

# प्रकरण तिसरे

# 'सहावं बोट' आणि 'हातचा १' या कथासंग्रहातील आशयसूत्रे

**प्रास्ताविक :**

या अगोदरच्या प्रकरणात आपण स्त्रियांच्या कथालेखनाचे स्वरूप आणि विशेष पाहिले. १९६० नंतर मराठी साहित्यामध्ये ग्रामीण साहित्य, दलित साहित्य याप्रमाणेच स्त्रीवादी साहित्य हा नवीन प्रवाह निर्माण झाला. स्त्रियांना त्यांच्यावरती होणाऱ्या अन्यायाची तीव्रतेने जाणीव निर्माण होऊ लागली. पुरूषप्रधान संस्कृतीमुळे त्यांच्यावरती जो अन्याय झाला. हा अन्याय स्त्रियांच्या मनामध्ये लाव्हा बनून राहिला होता आणि १९६० नंतर त्याचे रूपांतर ज्वालामुखी मध्ये व्हावयास मदत झाली. स्त्रिया त्यांच्या समस्या, विचार हे लेखनातून व्यक्त करू लागल्या. त्यामध्ये उर्मिला पवार यांचे स्थान उल्लेखनीय आहे.

उर्मिला पवार यांच्या 'सहावं बोट' आणि 'हातचा १' या कथासंग्रहाचे विशेष पाहत असताना त्यांनी आपल्या कथांमधून स्त्री जीवनाचे चित्रण कोणत्या प्रकारे केले आहे ? त्यांना समाजामध्ये वावरत असताना कौटुंबिक, सामाजिक,आर्थिक बाबतीत कशा प्रकारे संघर्ष करावा लागतो. त्यातून उर्मिला पवार यांनी दलित स्त्रीचे देखील चित्रण आपल्या कथांमधून केले आहे. दलित स्त्री तर दुप्पट दुखावलेली असते. एक तर ती स्त्री असते आणि दुसरे म्हणजे ती दलित असते. यामुळे दलित स्त्रीला जीवनामध्ये दोन्ही पातळ्यांवर संघर्ष करावा

लागतो. त्या स्वत: एक स्त्री असल्यामुळे स्त्रीचे जीवन त्यांनी अनुभवलेले आहे. भोगलेले आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनाला वास्तवतेची धार आहे. त्यांची लेखणी ही स्त्रियांच्या समस्या मांडताना उगमगत नाही. त्यांच्या कथेमधून येणाऱ्या नायिकांवरती आंबेडकरांची विचारधारा दिसून येते.

अशा या व्यासंगी आणि परिपूर्ण लेखन करणाऱ्या उर्मिला पवार त्यांच्या **'सहावं बोट'** आणि 'हातचा १' या कथासंग्रहातील आशयसूत्रांचा आपण विचार करू.

**उर्मिला पवार यांचे जीवन परिचय आणि वाङ्मयीन कर्तृत्त्व :**

उर्मिला पवार यांचा जन्म रत्नागिरीजवळ असणाऱ्या फणसवळे या गावी ७ मे, १९४५ रोजी झाला. महार समाजाची भिक्षुकी वडिलोपार्जित घराण्यात चालत आलेली होती. त्यामुळे त्यांचे वडीलसुद्धा हे काम करीत होते. पण वडील ७वी पास असल्याने त्यांना शिक्षकाची नोकरी मिळाली होती. तसेच मुलींकडे बघण्याचा त्यांचा हेतू पुरोगामी होता. उर्मिला बाईंना तीन भाऊ व तीन बहिणी होत्या. आपल्या अपत्याना शिकविण्याची वडिलांची जिद्द होती. पण त्यांच्या गावी शिक्षणाची सोय नसल्याने वडिलांनी रत्नागिरीला जिल्ह्याच्या ठिकाणी जागा घेऊन घर बांधले. शहरात राहिल्याने सर्वांचे शिक्षण चांगल्याप्रकारे चालले होते. मुलांबरोबर आपल्या मुलींनाही खूप शिकवावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा. पण नियती त्यांची इच्छा पूर्ण करू देत नाही. उर्मिलाबाई ९ वर्षाच्या असतानाच १९५४ साली त्यांच्या वडिलांचे निधन झाले. सर्व भावंडे शिकत होती. त्यामुळे आधार तुटला होता. पण अशा स्थितीत त्यांची आई मात्र खचली नाही. पती वारल्यानंतर तिनं सूप, टोपली, रोवळी, करंडे,

हारा हे विणण्याचे काम करूण सगळ्यांना शिकविले. पण ती स्त्री असल्याने तिला मुलींच्या बाबतीत विचार करायला लागला आणि उर्मिला पवारांचे ११वी पास झाल्यानंतर शिक्षण स्थगित झाले. त्याचवर्षी म्हणजे १५ मार्च, १९६६ रोजी हरिश्चंद्र पवार यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या.

उर्मिलाबाईंना शाळेत असल्यापासूनच सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेण्याचा उत्साह होता पण त्यावेळी उत्कृष्ट निबंधलेखन एवढेच काय त्या करू शकल्या लग्नानंतर लगेच १९९६ मध्ये बांधकाम खाते पी.डब्ल्यू.डी.सी. मध्ये नोकरी मिळाली. नोकरी मिळाली तरी आपण पुढे शिकलेच पाहिजे असे त्यांना सारखे वाटत होते. पण घरसंसार मुले, नोकरीच्या व्यापात परत शिक्षणाचा श्रीगणेशा करता आला नाही. पण तिसऱ्या मुलीनंतर म्हणजे १९७५-७४ पासून परत शिक्षणाला सुरवात केली नोकरी संसार मुलं अशी त्रेधातिरपीट करत करत बी.ए,पूर्ण केले १९७५ पासून कथालेखनाला सुरूवात केली. लोकप्रभा, रागिणी, हंस या मासिकांमधून लेख यायला लागले. त्यामुळे लेखनास प्रोत्साहन मिळाले त्या ज्या दलित समाजात वाढल्या त्या समाजाचा प्रभाव त्याच्यावर पडता होता. त्यामुळे आपल्या समाजातील स्त्री यांचे दु:ख चित्रित करावे असे वाटत होते. पण शहरात वाढल्यामुळे ग्रामीण दलित आणि शहरी स्त्रीच्या जीवनाचे चित्रण त्यांच्या कथेने केले. त्यांनी स्वानुभवाने खूप लिहिले. विशेषत: स्त्री असल्याने स्त्रीवादी साहित्याकडे लक्ष आकर्षिले लेखन करत करत १९८३ मध्ये मुंबईच्या सिध्दार्थ कॉलेजमध्ये एम.ए.चे शिक्षण पूर्ण केले. पण एम.ए.च्या अभ्यासक्रमात समीक्षा विषय अभ्यासल्याने आपण लिहितो ते बरोबर नाही असे वाटून लेखन खंडित केले आणि परत लेखनाची चांगल्याप्रकारे जाण आल्यावर लेखनाला १९८५ पासून सुरूवात केली.

अशा प्रकारे उर्मिलाबाईच्या जीवनात चांगल्या वाईट घटना घडत गेल्या. सगळ्यांच्या जीवनात जसा चढउतार असतो तसा त्यांच्याही जीवनात आला होता. त्यांच्या 'सहावं बोट' या कथासंग्रहाने त्या वाचकांसमोर आल्या व प्रसिध्द झाल्या त्यांच्या या कथासंग्रहाच्या कथा चार वर्षे कथा साहित्य संस्कृती मंडळाकडे पडून होत्या. जेव्हा अनुदान मिळाले तेव्हा 'सहावं बोट' हा कथासंग्रह व प्रकाशित झाला. नंतर एका वर्षात त्यांनी 'चौथी भिंत'या कथासंग्रहाच्या कथा लिहिल्या. अलिकडे त्यांनी 'हातचा १' हा कथासंग्रह लिहिला. अजुनही त्यांचे कथालेखन चालू आहे. पुस्तक रूपाने न आलेल्या परंतु मासिकाद्वारे प्रकाशित झालेल्या कथांची संख्याही बरीच आहे. 'आम्हीही इतिहास घडविला,' 'उदान', 'मॉरिशस एक प्रवास' आणि 'दोन एकांकिका' ही त्यांची इतर पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

**वाङ्मयीन कर्तृत्व :**

**प्रकाशित साहित्य –**

१. सहावं बोट – कथासंग्रह – १९८८

२. चौथी भिंत – कथासंग्रह –१९८९

३. उदान – भाषांतर बौध्द तत्वज्ञान – १९८९

४. आम्हीही इतिहास घडविला – (आंबेडकरी चळवळीत स्त्रियाचं योगदान – सह लेखिका) संशोधन ग्रंथ – १९८९

५. मॉरिशस एक प्रवास – प्रवास वर्णन– १९९४

६. दोन एकांकिका –

    १. इलास पावन्यानू बसा बसा १९९६

    २. मुक्ती

७. आयदान - आत्मकथन - ५ डिसेंबर २००३

८. डॉ. आंबेडकर जीवनकालपट (सह लेखिका) -५ डिसेंबर २००३

९. कथासंग्रह - हातचा १ - अक्षर प्रकाशन जुलै २००४

**पुरस्कार -**

१) 'साहित्य संस्कृती मंडळ', महाराष्ट्र राज्य १९८९

२) सहावं बोट - 'अस्मितादर्श ' (औरंगाबाद) १९८९

३) चौथी भिंत - 'शकुंतला नेने', मुंबई - १९९२

४) कथा वाङ्मय - 'व्ही.बी.गुर्जर', कोंकण साहित्य परिषद महाराष्ट्र - १९९५

५) 'आयदान' आत्मकथनासाठी

- 'प्रियदर्शनी ॲकडमी', मुंबई
- 'पद्मश्री - विखे पाटील'- प्रवरा नगर - २००४
- 'महाराष्ट्र फाउंडेशन'- अमेरिका २००४
- 'मातोश्री भीमाबाई आंबेडकर'- सातारा २००४
- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार मुंबई २००६
- प्र.श्री.नेरूरकर - पत्रकार संघ -मुंबई २००६

**प्रकाशित लेख आणि साहित्य -**

१. विविध नियतकालीकातून १९८७ पासून वैचारिक लेख प्रकाशित.

२. विविध विषयांवर शोधनिबंध सादर.

३. विविध सामाजिक संस्थां संस्थापक, सदस्य.

४. दुसऱ्या जागतिक मराठी परिषदेसाठी खास निमंत्रित मारिशस १९९१

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चित्रपटासाठी दलित वेशभूषा सल्लागार

६. 'कवच' कथा एस्.एन्.डी.टी. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात बी.ए.दुसऱ्या वर्षासाठी समाविष्ट – १९९१.

७. 'आयदान' मुंबई विद्यापीठाच्या एम.ए. च्या दुसऱ्या वर्षासाठी अभ्यासात समाविष्ट २००५ पासून.

८. मुंबई विद्यापीठाच्या पदवीपूर्व (११वी च्या) अभ्यासक्रमात 'आयदान' चा एक भाग समाविष्ठ २००६ पासून

आता त्यांच्या कथालेखनामागील प्रेरणांचा विचार करू.

**उर्मिला पवार यांच्या कथालेखनामागील प्रेरणा –**

'माझ्या लिखाणामागील प्रेरणा' याविषयी त्या महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या एका अंकात सांगतात, आज छापले; उद्या रद्दीत गेले अशा दिवाळी अंकातून माझ्या लेखनाला सुरूवात झाली..... मी कथेकडे वळले[१] म्हणजे त्यांच्या कथालेखनामागे प्रेरणा शब्द कारणीभूत ठरलेला दिसतो. पेरलं ते उगवतं या न्यायाने उर्मिला पवार लिहित गेल्या त्या प्रारंभी कथन करतात आणि यापुढे सांगतात. संस्कृत साहित्य मीमांसक मम्मटाने सांगितलेल्या कीर्ती या प्रयोजनानं मी लिहू लागले.[२] 'देवाचं देणं' ही त्यांची पहिली कथा होय. ही त्यांची कथा स्त्री प्रधान स्वरूपाची होती. या कथेवर गडकऱ्यांच्या एकच प्याला, पुण्यप्रभाव या विचाराचा पगडा होता. माणूस हा दैवाच्या हातच्या खेळ असतो असा पुराणमतवादी विचाराची खमंग फोडणी या कथेला होती. पुढे अशाच स्त्रीप्रधान 'सहावं बोट', 'शल्यं', न्याय इ. कथा लिहिल्या. 'सहावं बोट' (१९९८) हा माझा पहिला कथासंग्रह प्रसिध्द झाला. आणि कथालेखिका म्हणून माझ नाव

झालं आणि त्यापुढे सांगतात, 'मी दलित समाजातली असल्यामुळे दलित लेखिका असंही गौरविले..... फुले, आंबेडकरी प्रेरणेच्या माझ्या कथा नाहीत म्हणून टीका ही झाली. इतर दलित लेखकाप्रमाणे माझ्या कथांतून आंबेडकरी प्रेरणेच्या माझ्या कथा नाहीत म्हणून टीका ही झाली इतर दलित लेखकाप्रमाणे माझ्या कथांतून आंबेडकरी विचाराचा लाव्हा माझ्या कथेत आला नाही.'[३] याविषयी पुढे त्या म्हणतात, 'याचं कारण मी खेड्यात त्या दलित समाजात जन्मले होते तरी शहरात अन्यवर्गीय व्यक्तींच्या सहवासात लहानाची मोठी झाली. कोकणातल्या दलित वस्त्या अन्यवर्गीय वस्त्यापासून फार फार दूर नसल्याने आणि गरीबीचे जास्त चटके. कोकणातला दलित समाज भोगत असल्यामुळे 'अरे, ला का रे' न म्हणता शक्यतो अगदी लाचारीनं सुध्दा आपलं जगत राहायचं ही इथली वृत्ती होती. त्यामुळे इथला दलित समाज दलित चळवळीतही फारसा पेटून उठला नाही माझंही तसचं होतं. फुले आंबेडकरी विचार मी जाणतेपणी ऐकून, वाचून समजून घेतले आणि जोपर्यंत मन एखादी गोष्ट पहात नाही तोपर्यंत डोळ्याला दिसत नाही, तसं झालं लहानपणी भोगलेली गरिबी, जातीमुळे झालेला अपमान, अवहेलना, दलित स्त्रियांच्या जगण्याची दुहेरी वेदना आपोआपच शब्दाचा आधार घेऊ लागली पाच सुमारास माझ्या तरूण मुलाचं निधन झालं आणि ते दु:ख मनावेगळं करण्यासाठी मी स्वत:ला लेखनात बुडवल आणि 'चौथी भिंत'हा दुसरा कथासंग्रह तयार झाला. त्यातील चौथी भिंत या कथेतील जातीयता, तीव्र अशी स्पृश्यास्पृश्यतेची जाणीव, इथेही माणसं ज्याला त्याच्या आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्या मुलांनी घराबाहर हाकललं आहे. तो वृध्द दुसऱ्याच्या विकासासाठी काहीतरी करू शकतो ही जाणीव ठेऊन जगतो. असा फुले आंबेडकरी विचार या कथेत चित्रित केला.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

त्यानंतर दलितांच्या अनेकविध प्रश्नांचा वेध घेणाऱ्या 'धिंड', 'कार्यकर्ता, 'जाब' अशासारख्या कथा लिहिल्या.

वरील त्यांच्या निवेदनावरून कलावंत म्हणून असलेली स्वाभाविकता आणि दलित जीवन जाणिवा व्यक्त करण्यासाठी आंबेडकरी विचार स्वतःच्या, स्त्रियांच्या व इतर घटकांच्या जीवनाचाही वेध घेणे ही त्यांची कथालेखनाची पुढे प्रेरणा बनलेली दिसते. आणि 'स्व दुःख' हे 'समूह दुःख' च्या पातळीवर कथालेखनातून प्रगट करतात.

पुढे त्या फुले आंबेडकरी प्रेरणेसंबंधी आपले विचार प्रगट करताना त्या म्हणतात, 'फुले' आंबेडकरी प्रेरणा ही विशिष्ट समाजाला दिलेली किंवा आवश्यक असलेली प्रेरणा नाही . ती संपूर्ण मानवी समाजाला आवश्यक असलेली प्रेरणा आहे. माणसाला माणूस म्हणून जगण्याला व त्याच्या विकासाला जे जे अडथळे ते ते मोडा, तोडा, फेका किंवा बदला आणि माणसाचं जगण सोपं करा असं ही प्रेरणा सांगते.[५] या त्यांच्या म्हणण्यावरून फुले-आंबेडकरी प्रेरणा ही अखिल मानव-जातीचा विचार करून वैश्विक पातळीवर नेणारी कशी आहे ही त्यांच्या कथालेखनामागील एक महत्त्वपूर्ण प्रेरणा वाटते.

उर्मिला पवार यांच्या कथालेखनामागील प्रेरणांचा विचार केल्यानंतर त्यांच्या कथांतील आशयाचा विचार करू.

**स्त्री वरील अन्याय-अत्याचाराचे चित्रण करणाऱ्या कथा -**

वर्षानुवर्षे स्त्रीला अन्यायाचा सामना करावा लागला आहे. स्त्रीला मन आहे, भावना आहेत. तिचे स्वतःचे आस्तित्व आहे. याचा जणू पुरूषप्रधान संस्कृतीला विसरच पडला आहे. असेच चित्रण उर्मिला पवार यांच्या 'हातचा १'

या कथेमधून दिसून येते. या कथेतील काकी म्हणजेच रजनी हिला सर्वांनी हातचे धरले आहे. संसाराच्या रगाड्यात स्वतःच्या नावाचाही विसर पडलेली काही आपली एक किडनी नवऱ्याला देते तरीही त्याची तब्येत बिघडली जाते तेव्हा आपली किडनी आपल्याला परत बसवून मिळेल का? अस तिला वाटत नवऱ्याने आपल्याला मृत्यूपत्रात काहीच ठेवलं नाही म्हणून काकी मृत्यूपत्र जाळून टाकते. आजवर आपण कोमात होतो. आता आपण वेगळ्याच कुणीतरी झालो. समर्पितेचे जीवन जगणारी स्त्री अखेर सावध होते, तिला आत्मभान येते जगण्याचा अर्थ सापडतो आणि खिन्न, उपरोधिक आणि मग आपल्या दोन्ही मुलांकडे पहात आवाजात बळ आणून काकी म्हणते, "अरे बाबांनो, मीही आयुष्यभर कोमातच होते रे... खरंच कोमात होते. बघताय काय असे? अरे मी कोमात होते म्हणूनच शेवटच्या क्षणापर्यंत, तुम्ही कुणीही माझा विचार केला नाहीत, आणि मीही केला नव्हता. हातचा एक राखायचा असतो हे मला कळलंच नव्हतं. पण खरं सांगू, मी हातचा एक गमावला नाही; राखलाय. तोही केवळ माझ्यासाठी नाही आपल्या सर्वांसाठी खरंच आपल्या सर्वांसाठी..."[६]

'माझी माणसं' या कथेतील नवऱ्याच्या छळामुळे मेंटल हॉस्पिटलमध्ये जावे लागणारी कमळी नंतर डॉक्टरी उपचारांमुळे शहाणी होते. तरीही तिला स्वीकायला, तिच्यावर माया करायला, सासरचे, माहेरचे कोणीच तयार होत नाही माहेरच्या जमिनीत हिस्सा घेऊन त्या पैशातून बऱ्या झालेल्या वेड्यांसाठी घर बांधण्याचा निर्णय ती घेते. अनेक अपेक्षा घेऊन सासरी आलेली, प्रतारणेचे दुःख सहन न झालेली पुरूषांवर अवलंबून असणारी ही स्त्री नंतर खऱ्या अर्थाने शहाणी होते. आणि भावांदेखत डॉक्टरांना म्हणते, "होय डॉक्टर, मी तेव्हाही वेडीच होते. आताही वेडीच आहे. मला वाटलं होतं की मी शहाण्यांच्या जगात

जातेय. माझ्या मायेच्या, प्रेमाच्या माणसांमध्ये जातेय. मी त्यांना भेटायला उत्सुक आहे. तशी तीही मला भेटायला उत्सुक असतील. मला जवळ घेतील. पण डॉक्टर, तो माझा भ्रम होता. ही माझी माणसं नाहीत. मला, मला आता मला यांच्याकडे जायचं नाही.)"[७]

## नवऱ्याच्या संशयी स्वभावाला बळी पडलेल्या स्त्रिया –

'सहावं बोट' या कथेत अपत्यहीन स्त्रीची पारंपरिक वेदना ना.सी.फडके टाईप केलं, उत्कंठा, उकल असं काही नवी तंत्र वापरून ती प्रकट केली आहे. स्नेहा नावाच्या स्त्रीला मूल नाही. तिच्या नवऱ्याला झालेल्या ॲक्सिडेंटमुळे मूल होईल याची तिला खात्री नसते. अशावेळी स्नेहाला दिवस जातात. आणि ते कुणापासून हा प्रश्न तिच्या नवऱ्याच डोकं पोखरतो. तो आपल्या मित्राचा संशय घेतो. स्नेहाला छळ करतो. अखेर स्नेहा प्रसूत होते. तेव्हा तिला झालेल्या मुलाच्या हाताला सहा बोटं असतात. तिच्या नवऱ्याच्या हाताला सहा बोट असतात आणि ते मूल त्याचच हे उघड होत; पण तेव्हा मानसिक व शारिरीक त्रासांतून स्नेहाचा अंत होतो आणि तिच्या नवऱ्याला पश्चाताप होतो.

'संशय' या कथेमध्ये स्वभावाने मोकळी अन् भाबड्या असणाऱ्या माधवीवरती सदाशिव संशय घेतो. माधवी ही स्टेनोग्राफर होती. त्यामुळे बॉसबरोबर तिचे बोलण हे होतं होत. सदाशिवला वाटायचे की, माधवी बॉसबरोबर बोलते फिरते म्हणजे त्यांच्यामध्ये काहीतरी असणारच. स्वत:च्या भावानेच माधवीवरती लक्ष ठेवायला सांगितल्यामुळे त्याचा संशय अधिकच बळावतो. त्यामुळे माधवीच्या प्रत्येक कृतीत त्याला विश्वासघात दिसू लागला.

"हेच का केलंस ?  तेच का नाही केलंस ! आज उशीर का झाला ? आज लवकर का चाललीस ?  एवढी कशाला नटतेस, कोण बघणार आहे ? आज नटत का नाहीस ?  कोण बघायला नाही ?  गॅलरीत का उभी ?  हेच का आणि तेच   का ?"[८]

माधवी बॉसबरोबर दोन चार वेळा चहाला गेली तर बिघडलं कुठं. पुरूषांच्या बरोबरीनं वागणाऱ्या स्त्रीला तेवढं स्वातंत्र्य असायला काय हरकत आहे. केवळ संशयामुळे सदाशिवच्या संसाराची होळी होते.

'प्लॅस्टिकचा कान' या कथेमध्ये कस्तुरे हा वंदनाचा प्रियकर असतो. तिने ऑफिसमध्ये कुठल्या परपुरूषाशी बोललेले आवडत नव्हते.  याबाबतीत त्याचे विचार बुरसटलेले होते.  पण एकदा अमेरिकेत डॉक्टर असणारा कुणी दूरचा भाऊ तिला भेटायला कंपनीत आला. वंदनाने त्याला चहा कॅन्टीनमध्ये पाजला यावरून कस्तुरेन काय केल हे सांगतांना सुजा म्हणते, "अग, त्याने कंपनीत, वेटींगरूममध्ये चक्क तिचा कान कापला."[९]

कस्तुरेने कान कापूनदेखील वंदना प्लॅस्टिकचा कान लावते.  कस्तुरेला ती कोणतीही शिक्षा करत नाही. नेहमी अस स्त्रीनेच पुरूषांना समजून घ्यायचे का ? तिती वेड प्रेम करीत होती. वंदना असा प्रश्न आपल्या डोळ्यासमोरून तरळत रहातो.

## विधवा स्त्रियांची दु:खे :

'न्याय' या कथेची नायिका पारू ही विधवा आहे. ती स्वत: काबाडकष्ट करून आपल्या सासू-सासऱ्यांना सांभाळत असते. परंतु ती एकदा शहरात केळी विकायला जात असताना तिच्यावरती बलात्कार होतो.  त्यातून पारूला दिवस

जातात आणि समाजातील लोक मात्र विधवा बाईला दिवस गेले म्हणजे ती वाईट चालीची असे म्हणून तिला हिणवत असतात. त्या मुलाचा बाप कोण हे पारूला विचारण्यासाठी सभा घेतात. त्यामध्ये तिला विचारतात हे मूल कोणाचे ? तेव्हा ती घडलेली हकीकत सांगते. पण लोक जेव्हा आम्ही हे मूल वाढू देणार नाही तेव्हा पारू म्हणते, ''का नाही देणार ? मी एक स्त्री आहे. मलाही भावना आहेत. मन आहे. प्रत्येक स्त्रीला आई व्हावसं वाटतं. मलाही वाटतं. कुणाच्याही मुलाची का असेना मी आई आहे. मलाही कुणाचा तरी आधार हवाच. मी विधवा, मला मरेपर्यंत कुणाचा आहे आधार ? तुमच्यापैकी कुणी मला आधार द्यायला आहे का तयार ?''[१०]

तेव्हा मात्र तिला आधार द्यायला कुणी तयार होत नाही. चूक दोघांची असली तरी नेहमी स्त्रीलाच का समाजामध्ये प्रश्नांना उत्तरे द्यावी लागतात. का हा समाज पुरूषाच्या चुकीसाठी सभा भरवत नाही. असा किती दिवस स्त्रीने अन्यय सहन करत रहायचं. 'स्त्री' आणि 'पुरूष' हे दोघेही त्याच समाजामध्ये वावरत असतात, घटक असतात असे अनेक सवाल उभे रहातात.

'आये' या कथेमधील 'आये' ही विधवा आहे. तिच्या मुलाबाळांना ती सूप, रोवळ्या, हारे करंडे विकून येणाऱ्या पैशातून सांभाळत असते. पण ती एकटी घरात कुणी कर्ता पुरूष नाही. म्हणून स्वत: तिचा दिरच तिची शहरातील राहती जागा बळकावण्याच्याय तयारीत असतो. त्यासाठी तो आयेला पटविण्यासाठी सोनेश्वरबुवाना आणतो. तात्या म्हणतात, ''व्हनी, तुला माजं म्हननं पटनार नाय, हे मला ठावं होतं. म्हणूनच मी सोमेश्वर बुवाला आणलाय. तो मोठा ग्यानी मानूस हाय. भूतभवीस जानतो. तां तुला ह्या जमिनीची परचिती दावील. मग तरी तू तुजा हट सोड नी माज्या आयशी, पोरान घे नी चल बगू घराकड.''[११]

'कार्यकर्ता' या कथेतील एका कार्यकर्त्यांची बायको असणाऱ्या सुभद्रेची तच्या मृत्यूनंतर किती दयनीय अवस्था होते याचे चित्रण केले आहे. सुभद्रा दुसऱ्याची धुणी-भांडी करून आपल्या मुलांचा सांभाळ करत असते. सयाजीचा मित्र कमलेश जेव्हा चुकून तिला भेटतो. तेव्हा तिची विचारपूस करतो तेव्हा सुभद्रा म्हणते, "कशाच बरं दादा. नोकरीसाई हिंडतूय वनवन पन तीबी एकांदी गावना आताकुटं रेलीखाली जीव द्यावा का ? काय करावं ते बी कळंना बगा."[१२]

अशा प्रकारे या कथेत कार्यकर्त्याला त्याचा समाजच कसा विसरून जातो आणि त्याच्या बायका पोरांच्या दुःखाकडे पाठ फिरवतो हे दाखवून माणसातील सुष्टदुष्ट प्रवृत्तीकडे बोट दाखवतात.

## अविवाहीत तरूणींची दुःखे :

'सुठे गिरान' या कथेमधील तरूणी सुमती सबनीस ही उंचीने बुटकी आहे. त्यामुळे ती कोणामध्ये फारसे मिसळत नसते. उंचीने लहान असल्यामुळे तिच्याशी कोणी लग्नाला तयार होत नाही. आपल्यालाही जोडीदार असावा. आपणही लग्न करावे असे तिला वाटत असते. तेव्हा ऑफिसमधल्या सुरेशला की ज्याचा एक हात प्लॅस्टिकचा आहे. त्याला लग्नाबद्दल विचारते तेव्हा तो म्हणतो, "मी जीवनाची अपूर्णता जाणतो ते अपूर्ण आहे म्हणून जगण्यासारखं आहे. पण अपूर्णतेलाही कुठेतरी मर्यादा हवीच ना.... कसं सांगू तुम्हाला....?"[१३]

सुमतीला सुरेश नकार देतो तू सेक्श्युली अॅट्रॅक्टिव्ह नाहीस अस म्हणतो. त्यामुळे तिच मन उद्ध्वस्त होते. बलात्कार करण्यासाठी उंचीने आणि वयाने

लहान मुलगी चालते. पण केवळ उंची लहान म्हणून मी सेक्श्युली ॲट्रॅक्टिव्ह नाही या विचाराने तिच्या मनाच्या चिंध्या होतात.

'वर्तुळ' या कथेत नेत्रा खोपकर ही चांगली कलावंत आहे. चित्रकार आहे. परंतु परिस्थिती गरीबीची, हुंडा देवू शकत नाही. म्हणून तिला लग्नाच टेन्शन आल आहे. ती लग्नाबद्दलच्या जाहीराती वाचत असते. असेच एकदा मलेशियातील मुलाला इंडियन मुलगी लग्नासाठी हवी आहे. म्हणून ती आपला त्या पत्यावर बायोडाटा पाठविते. परंतु तिला तिथून पत्र येत नाही म्हणून ती बाईंच्या भाषणावरून बाईंना भेटते तिची ती तळमळ पाहून बाई तिला मदत करायला तयार होतात. त्या मनात म्हणतात, ''बाईनं बाईचं दु:ख जाणलं पाहिजे, तिला धीर दिला पाहिजे या विचारातील शहाणपण माझ्या रक्तत भिनू लागलं होत. त्या शहाणपणातून स्त्री ही स्त्रीची शत्रू नसते, मैत्रिण असते ही भावना मनात जागली होती. त्या भावनेनं मी तिच्याकडे पाहू लागले.''[१४]

नेत्रालाही आपल लग्न ठरत नाही याची काळजी आहे. आपल लग्न ठरण्यासाठी ती मॉरिशसपर्यंत पत्र पाठविते परंतु तिथेही धर्म, गोत्र, जात आडवी येते.

**आंबेडकरी विचारधारा असणाऱ्या नायिका नायक :**

'आये' या कथेतील आये ही विधवा आहे. ती आपल्या मुलाबाळांसमवेत शहरात रहात असते. तेव्हा तात्या म्हणजे तिचा दीर तिला म्हणतो गावी रहायला चल, शहरात त्रास झाला तर पाठीशी कोण आहे तेव्हा आये म्हणते, ''अवो पन हे नेमी म्हनायचे, बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल हाय खेडी सोडा, शेरात जा.''[१५]

'भूमिका' या कथेतील शिदू हा जातीने महार आहे. त्यामुळे रामनवमी निमित्त केशवरावांच्या वाड्यावर जी मंडळी आलेली असतात ती विटाळ होतो. म्हणून शिदूपासून लांब रहात असतात. शिदू हा रंगाने सावळा असला तरी त्यचा आवाज गोड आहे. तो एक चांगला कलावंत आहे. केशवरावांचा तो नोकर असतो. परंतु केशवराव त्याला घरातील एका सदस्याप्रमाणेचमानत असतात. नाटकाची वेळ झाल्यानंतर अचानक रामाच्या पोटात दुखायला सुरूवात होते. त्याला आपेंडिस झालेला असतो. तेव्हा कशेवराव शिदूला राम बनण्याचा आग्रह असतो. तेव्हा केशवराव शिदूला राम बनण्याचा आग्रह करतात पण शिदू तयार होत नाही. तो म्हणतो, ''ह्या ह्या तुमच्या रामपायी मासं आई वडील, चुलता, माझा आजा, आमचं सगळं घर बंचिराख झालं. मंडळी तुमी बसला याच ठिकाणी काळाराम मंदिराच्या प्रदेशासाठी आमच्या बाबासायबानी सत्याग्रह केला. आमी हिंदू हाय, आमालाबी देवाचं दर्शन घ्यायचा हक हाय. आमाला मंदीरात जाऊ द्या, देवाचं दर्शन घेऊ द्या. म्हणून आमच्या हजारो लोकांनी या देवासमोर – रामासमोर धरणं धरली. पण आम्हाला देवानं जवळ येऊ दिलं नाही. उलट आम्ही मंदीरात जाऊ नये म्हणून आमच्यावर दगड, काट्या, लोखंडी कांबी यांचा मारा झाला. माज्या आईचं टकुरं फुटलं. बाची छाती फुटली. चुलता, आजा आणि कित्येक लोक रगतानं न्हालं. तरीबी या देवाला आमची दया आली न्हाय. ह्यो देव सुद्धा आमाला आपलं म्हनाला न्हाय. तीन म्हयनं ह्यो राम कुलुपात बसून ऱ्हायला, ह्यानं आमाला दर्शन दिलं न्हाय.''[१६]

'धम्मचक्र' या कथेतील सीतामायच्या नवऱ्याला जाळायचा की पुरायला हा वाद सुरू असतो. सीतामाय ही हट्टी असते ती म्हाताऱ्याला पुरायचा अस म्हणत असते. मातीतली काया मातीतच जावू दे अस तिच म्हणण असत. मागे

पण सीतामायन गावाला कोड्यात टाकल होत. ते आठवून एकजण म्हणाला, ‘‘होय होय, रूपाजी. अरे तुज्याच लग्नातली गोष्ट ना रे, तुला आठवत नाय ? अरे मालवणाक धर्म घेतलो. त्याच वर्साक तुजा लगीन झाला ना रे ? तेवा व्हकलेच्या गळ्यात काळ्या मन्यांचा मंगळसूत्र यापुढे बांदायचा नाय, पांढऱ्या मोत्याची माळ बांदा व्हयी तर.... असो तिडा तुज्या म्हातारेन अख्ख्या गावाक टाकल्यान हुतो की नाय ?’’[१७]

‘बस्ता’ या कथेमध्ये वधू-वरासाठी कपडे खरेदी करताना वाद होत असतात. वधूच्याय कपड्यांना जरा जास्त खर्च होणार तर मुलाकडची मंडळी वराच्या कपड्याच्या किंमतीतच वधूची कपडे बसवा यावरून वाद सुरू असतो तेव्हा वराकडचा एक माणूस वधूपक्षाची समजूत घालत म्हणाला, ‘‘हे बघा, आपल्याला लग्न साधेपणानं लावा, जास्त खर्च करू नका, असं बाबासाहेब सांगून गेले, हे लक्षात घ्या.’’[१८]

‘जाब’ या कथेमध्ये स्वातंत्र्य दिवसा दिवशी झाडू कामगारांचा सत्कार होणार होता. त्यासाठी प्रशासनाने त्यांना सुट्टी जाहीर केली होती. अचानक सुट्टी रद्द झाली. तेव्हा कामगार नेत्याने झाडू कामगारांना एकत्र बोलावून भाषण दिले ते म्हणाले, ‘‘या खोल्या म्हणजे बाबासाहेबांनी एका गोष्टीत सांगितलेल्या शेवग्याच्या शेंगाचं झाड आहेत. जोपर्यंत त्या झाडाची आशा आपण करत बसू, त्याच्या एवढ्याशा शेंगांवर दिवस काढू, तोपर्यंत या घाणीतच राहू. आपल्याला चांगले दिवस दिसणार नाहीत. ते झाड आपण तोडलं पाहिजे. आपण काही बोलत नाही, कार्पोरेशनला जाब विचारत नाही, म्हणून ही दडपशाही चाललेय. ती आता आपण चालू द्यायची नाही. आपल्या पांडुरंगच काय झाल ?

पांडूरंगसारखे आपले कित्येक कामगार गटारातल्या किड्यासारखे, मरतायत. त्यांची दखल कोण घेतोय नाही का नाहो ? आपण जाब विचारत नाही म्हणून.")

'त्याग' या कथेतील हरी आणि मोहन छात्रालयातून शिकून गावी येतात. त्यापैकी हरी हा दलित असतो तर मोहन हा सवर्ण असतो. गावामध्ये कितीही मोठा ऑफिसर झाला तरी सवर्ण शिपायापेक्षा त्याला कमीच मान दिला जातो. शवेटी तो नोकरीचा राजीनामा देतो आणि मनाशीच म्हणतो, "आता त्याला कळलं गांधीजी म्हणत होते. .... खेड्यात जा. त्यांचा तो आदेश होता स्पृश्य लोकांसाठी. बाबासाहेबांचा आदेश होता तो अस्पृश्यांसाठी, दलितांसाठी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना माहित होते की, खेडेगावातच अस्पृश्यता जास्त मानली जाते. खेड्यात त्यांचा उत्कर्ष होणं ?"[१९] कठीण आहे. म्हणूनच बाबासाहेब सांगत होते. खेडी सोडा...!

**मातृत्वासाठी त्रास सोसणाऱ्या स्त्रिया :**

'शल्य' या कथेमध्ये ज्योतीला पाच मुली आहे. पंरतु सासूला मुलगा हवा असतो त्यामुळे ज्योती सहाव्या वेळेस नर्सला मुलांची आदलाबदल करावयास सांगते. तिची मुलगी ज्या बाईला बदलून दिलेली असते. ती अविवाहीत असते. ती त्या मुलीला मारून टाकणार असते तेव्हा ती म्हणते, "मारू नका, मारू नका हो हिला, जगूं द्या, तिला जगू द्या !"[२०]

ज्योतीला मुलांची आदलाबदल करावयाची नसते. सासूचे टोमणे, हल्ली तिचा नवराही दुसऱ्या लग्नाबद्दल उघड उघड बोलतो त्यामुळे मुलांची आदलाबदल करण्याइतकी तिची मानसिकता जाते.

अशाचप्रकारे 'सहावं बोट' या कथेतील स्नेहलता हिला लवकर मूल होत नाही. परंतु जेव्हा ती आई होते तेव्हा तिच्या नवऱ्याच्या संशयामुळे, त्याच्या त्रासामुळे मूल आणि स्नेहा दोघांचाही अंत होतो.

'न्याय' या कथेतील पारू ही विधवा असते. तिच्यावरती एके दिवशी बलात्कार होतो. तिला दिवस जातात सारा गाव पारूच्या विरोधात जाते. परंतु तिच आईच हृदय त्या मुलाला मारू देत नाही. ती म्हणते, "कुणाच्याही मुलाची का असेना मी आई आहे."[२१]

'दु:खाची जात' या कथेमधील सीताबाई हिचा मुलगा मुंबईला पुष्पाकडे कामाला असतो. अचानक त्याचा एके दिवशी अपघात होतो. त्यातच तो जातो. तेव्हापासून बडबडीअसणारी सीताबाई अबोल होते. त्यामुळे पुष्पा सीताबाईला खोटीच तार पाठविते व मुंबईला बोलवून घेते. तेव्हा सीताबाई ही मुंबईला जाते आणि जात असताना बाहेर बघते. तर एका मुलाचा अपघात होतो ती टॅक्सीचा दरवाजा उघडून त्या गर्दीतून आत घुसतं. "रक्ताच्या थारोळ्यात तडफडणाऱ्या त्या तरूणाला एकटक बघत राहिली. नि बघता बघता ज्वालामुखीने धडकमारून बाहेर पडावं तसा एक अस्फुट हुंदका तिचे काळीज चिरून आला आणि मागोमाग शब्दांचा ओघ पाहू लागला."

'अग बाई ग ? असा कसा रे तू गाडीखाली आलास ? नीट नाही का बघायच तरी मी नेहमी तुला सांगायची रस्त्याने जपून चाल जीवाला जप, ऐकलं नाहीस ना माझ ? असा कसा रे तू विसरलास.... अहो उचला हो त्याला न्या हं माझ्या बाळाला दवाखान्यात लवकर... पहा पहा कसा डोळे फिरवतोय, बघता बघता सीताबाई हंबरडा फोडून रडू लागली.'[२२]

'फुटे सावरीचं बोंड' या कथेत यमुनाकाकी मूलबाळ नव्हते त्यामुळे काका दुसर लग्न करतात. त्या मुलाचं करण्यात यमुनाकाकीला आनंद वाटायचा.

काकान दुसर लग्न केले म्हणून तिच्या मनामध्ये कोणतीही अढी नव्हती. उलट आपल्या सवतीच्या मुलाला खेळवण्यात त्याच सर्वकाही करण्यात तिचा दिवस जायचा, ''बाळाच्या पाटीवर थोपटणारा तिचा जणू तिचंच फाटलेलं, उसवलेलं हृदय आवरतोय, सावरतोय असं वाटायचं.''[२३]

**सारांश :**

उर्मिला पवार यांच्या कथेतील आशयसूत्रांचा विचार करण्यापूर्वी लेखिकेच्या जीवनाचा व त्यांच्या साहित्याचा, त्यांच्या कथालेखनामागील प्रेरणांचा विचार केला. लेखिकेने स्त्रियांच्या समस्या, त्यांच्या वेदना मांडण्याचा यशस्वी प्रयत्न 'सहावं बोट' आणि 'हातचा १' या कथासंग्रहातून केला आहे. त्यांच्या कथांतील आशयसूत्रांचा विचार करता स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचार चित्रित करणाऱ्या कथा, नवऱ्याच्या संशयी स्वभावाला बळी पडलेल्या स्त्रिया, विधवा स्त्रियांची दु:खे, आंबेडकरी विचारधारा व्यक्त करणाऱ्या कथा, इ. आशयसूत्रे आढळतात. त्यांच्या प्रत्येक कथेमधून आपणास एक नवा बोध मिळतो. उर्मिला पवार यांनी मालवणी, हिंदी, इंग्रजी या भाषेचा वापर पात्रांच्या तोंडी अगदी व्यवस्थित केला आहे. त्यामुळे त्यांच्या कथेतील आशयाला जिवंतपणा प्राप्त होतो.

पुढील प्रकरणात 'सहावं बोट' आणि 'हातचा १' या कथासंग्रहातील अभिव्यक्ती विशेष पाहू.

-----

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## प्रकरण तिसरे

## संदर्भग्रंथ


| | | | |
|---|---|---|---|
| १) | पवार, उर्मिला | : | 'महाराष्ट्र साहित्यपत्रिका', अंक क्रमांक ३०१, एप्रिल/मे/जून,२००२, माझ्या लिखाणामागील प्रेरणा, पृष्ठ क्र. ६५-६६. |
| २) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र. ६६. |
| ३) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र. ६७. |
| ४) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र. ६८. |
| ५) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र. ६९. |
| ६) | पवार, उर्मिला | : | हातचा १, अक्षर प्रकाशन, मुंबई, २००४,पृष्ठ क्र.२९. |
| ७) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.४३. |
| ८) | पवार, उर्मिला | : | 'सहावं बोट',संबोधि प्रकाशन,मुंबई, १९८८,पृ.३०. |
| ९) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र. ५३. |
| १०) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र. २७. |
| ११) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र. ३०. |
| १२) | पूर्वोक्त, | : | पृष्ठ क्र. ८९. |
| १३) | पूर्वोक्त, | : | पृष्ठ क्र. १३. |
| १४) | पूर्वोक्त, | : | पृष्ठ क्र. ६२. |
| १५) | पवार, उर्मिला | : | 'सहावं बोट',संबोधि प्रकाशन,मुंबई, १९८८,पृ.३०. |
| १६) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र. ८३. |
| १७) | पूर्वोक्त, | : | पृष्ठ क्र. १०. |
| १८) | पूर्वोक्त, | : | पृष्ठ क्र. ७२. |
| १९) | पवार, उर्मिला | : | 'सहावं बोट',संबोधि प्रकाशन,मुंबई, १९८८,पृ.८५. |
| २०) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र. ९. |
| २१) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र. २७. |
| २२) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र. ९६. |
| २३) | पूर्वोक्त, | : | पृष्ठ क्र. १४१. |


-----